# चिंचणे (ता. चंदगड) : गांधी विचार आणि स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव आणि परिणाम

**डॉ. सौ. वैशाली अभिजीत सारंग,** सहाय्यक प्राध्यापिका, इतिहास विभाग,
डी.डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर, drvaishalisarang@gmail.com

---

भारतीय स्वातंत्र्य लढा 1857 ते 1947 पर्यंत चालला. त्याचा अंतिम उद्देश भारतातील ब्रिटिश राजवट संपवणे हा होता. बंगालमधून उदयास आलेली 'राष्ट्रवादी क्रांतिकारी चळवळ' भारतीय स्वातंत्र्याची ठिणगी ठरली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने या चळवळीचा पाया रचला. त्यामध्ये सहभागी झालेल्या प्रमुख राष्ट्रीय नेत्यांनी या चळवळीतून देशातील नागरिकांत स्वातंत्र्याची जाणीव करून दिली. त्यामुळे देशभरात भारताच्या स्वातंत्र्याची मागणी जोर धरू लागली. ब्रिटिश राजवटी विरुद्ध देशभर जन आंदोलन उभे राहिले. सन 1920 पासून 1947 पर्यंत महात्मा गांधीजींनी राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली असहकार, कायदेभंग व चलेजाव चळवळ झाली. यामध्ये महाराष्ट्र आघाडीवर होता.

महाराष्ट्रातील विशेषत: पश्चिम महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातील अनेक स्वातंत्र्यवीरांनी स्वातंत्र्य चळवळीत आपला सहभाग नोंदवला. वेळप्रसंगी प्राण पणाला लावून आपली देशप्रेमाची प्रचिती दिली. त्यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील अनेक स्वातंत्र्य सैनिकांचा या चळवळीत सहभाग हा अधोरेखित करण्यासारखा आहे. त्यामुळे या स्वातंत्र सैनिकांवरील गांधी विचारांचा व स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव आणि परिणाम या विषयावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या संशोधन लेखातून केला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुका हा स्वातंत्र्यापूर्वी बेळगाव जिल्ह्याचा एक भाग होता. भौगोलिक दृष्ट्या हा भाग अनेक डोंगरदऱ्यांनी व्यापला आहे. अशा या तालुक्यातील 42 स्वातंत्र्यसैनिकांची नावे शासकीय नोंदीमध्ये आढळतात. (महाराष्ट्र शासन, स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोष खंड-३ १९८०) चंदगड पंचायत समिती कार्यालय चंदगड येथील स्वातंत्र स्मारकावर 23 स्वातंत्र्य सैनिकांची नावे आहेत. (स्वातंत्र्य सैनिक स्मारक, चंदगड पंचायत कार्यालयासमोर) चंदगड तालुक्यातील चिंचणे हे एक छोटेसे गाव स्वातंत्र्यपूर्व काळात जेमतेम १००-१५० लोकसंख्या असलेले, डोंगरदऱ्यांनी व जंगलाने वेढलेले, ताम्रपणी नदीच्या काठाशी वसलेले एक खेडं. विशेष बाब म्हणजे या छोट्याशा गावातील तब्बल 10 स्वातंत्र सैनिकांची नावे भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात सुवर्ण अक्षराने लिहून चिंचणे गावचा गौरव वाढवला आहे.

या गावाला तुलनेने जवळ असलेले मोठे शहर म्हणजे बेळगाव होय. परिणामी आसपासच्या या खेड्यांचा यां ना त्या कारणाने बेळगाव या शहराशी संपर्क येत होता. त्याकाळी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वेगवेगळ्या सभा, परिषदा, आंदोलने इ. बेळगाव मध्ये होत असत. परिणामी या प्रभावामुळे आसपासच्या खेड्यातील अनेक तरुण या राष्ट्रीय काँग्रेसच्या सभा, मोर्चे, आंदोलने तसेच विविध चळवळींमध्ये हिरीरीने सहभागी होऊ लागले.

चंदगड तालुका हा अतिदुर्गम परिसर असून, स्वातंत्र्यपूर्व काळात चिंचणे या गावी पोहोचण्यासाठी रस्ते नव्हते. जंगल, डोंगरदऱ्यातून निघालेल्या पायवाटेने आजूबाजूची गावे एकमेकांना जोडली होती. त्यामुळे येथे दळणवळणाची कोणतीही साधने नव्हती. प्रचंड पाऊस व पायवाटानवरती चिखल व्यापलेला असे. अशा अवस्थेत गुडघाभर चिखलातून जावे लागे. अशा विपरीत गोष्टींवर मात करूनही या गावातील लोकांमध्ये स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊन ब्रिटिशांच्या विरोधात उभी राहण्याची उत्कटता अधिक होती.

या स्वातंत्र्य सैनिकांपैकी एक म्हणजे गुंडू लक्ष्मण कांबळे (1899 ते 1959) हे होत. ते लहानपणापासून धाडसी स्वभावाचे होते. ते ब्रिटिश अधिकाऱ्यांकडे 'हळब' म्हणून काम करीत होते. जमिनीचे व शेतसारा वसुलीचे रेकॉर्ड आपल्या डोक्यावरून वाहून जंगलातील पायवाटेने बेळगाव येथील ऑफिस पर्यंत पोहोचवण्याचे काम हे हळब करीत असत. हे काम करीत असताना गुंडू कांबळेंना ब्रिटिश शासनाकडून गरीब शेतकऱ्यांवर होणारा अन्याय, अत्याचार, शेतसाऱ्याच्या नावावर होणारी लूट, प्रसंगी होणारी मारझोड इ. मुळे त्यांना ब्रिटिशांबद्दल चिड निर्माण

झाली असावी. या कामामुळे गुंडू कांबळे यांचा बेळगाव शहराशी सतत संपर्क असे. त्यातून बेळगाव येथे होणाऱ्या महात्मा गांधींच्या विचाराने व प्रेरणेने प्रभावित झालेल्या स्वातंत्र्य चळवळीच्या सभा, वेळोवेळी होणारी काँग्रेसची आंदोलने त्यांनी जवळून पाहिली व अनुभवली. त्यामुळे तेही प्रभावित झाले. हळब म्हणून काम करीत असताना त्यांना ब्रिटिशांच्या गोटात राहण्याची संधी मिळाली. त्यातून त्यांनी ब्रिटिशांची महत्त्वाची माहिती स्वातंत्र्यसैनिकांना पुरवणे, भूमिगत स्वातंत्र सैनिकांना गुप्तपणे मदत करणे इ. कामे त्यांनी केली. गावातील सवंगड्यांबरोबर ते बेळगाव मध्ये होणाऱ्या सभांबद्दल संवाद साधत. महात्मा गांधींचे विचार, ब्रिटिशांची मुजोरी, दडपशाही याबद्दल त्यांची चर्चा होत असे. त्यामुळे गावातील बरेचसे तरुण स्वातंत्र्य प्राप्तीच्या ध्येयाने प्रेरित झाले व त्यांनी वेगवेगळ्या मार्गांनी स्वातंत्र्य चळवळीत सहभाग नोंदवला.

चिंचणे शेजारील कुदनुर या गावी ब्रिटिशांचा तळ असे. येथे परिसरातील शेतकऱ्यांकडून वसूल केलेला कर, धान्य रोख स्वरूपात जमा केला जात असे. याच ठिकाणी गुंडू कांबळे यांनी भूमिगत चळवळीला मदत केलेच्या आरोपांवरून त्यांना पकडण्यात आले. व त्यांना तेथील माळरानावर नेऊन एका मोठा दगडावर पाडून त्यांच्या छातीवर मोठा दगड ठेवून तो ब्रिटिश सैन्या करवी फोडण्यात आला, त्यांना अमानुष मारहाण केली. त्यामध्ये ते बेशुद्ध झाले. ते मृत झाले आहेत असे समजून ब्रिटिश अधिकारी सैन्यांसह निघून गेले. पण सुदैवाने मध्यरात्री त्यांना जाग आली. आणि स्वतःला वाचवण्यासाठी ते नदीमार्गे आपल्या गावी परतले. त्यानंतर त्यांनी हळब म्हणून काम करणे सोडून दिले आणि पूर्णवेळ स्वतःला देश सेवेसाठी वाहून घेतले. याचाच परिणाम म्हणजे त्यांचा 1942 च्या चळवळीतील सक्रिय सहभाग होय. (चुलत भाऊ दत्तात्रय सारंग, नातसून गंगुबाई कांबळे, पणतू गुंडू कांबळे यांची मुलाखत, महाराष्ट्र शासन, स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोष, पान नं. ७)

गुंडू कांबळें वरील या हल्ल्याला प्रतिउत्तर देण्यासाठी गावातील इतर भूमिगत स्वातंत्र सैनिकांनी कुदनुर आणि दड्डी येथील सर्वसामान्य जनतेकडून जादा करवसुली करणाऱ्या अधिकाऱ्यांवर हल्ले केले. अशी माहिती स्वातंत्र्यसैनिक बसवंत चिगरी यांचे नातू विठ्ठल लक्ष्मण चिगरी यांच्या मुलाखतीतून पुढे येते.

गुंडू कांबळे यांचे एकुलते एक चिरंजीव विठ्ठल गुंडू कांबळे (१९१९-२०१७) यांनी वडिलांच्या प्रेरणेने स्वातंत्र्यलढ्यात आपला सहभाग नोंदवला आहे. वडील हळब म्हणून काम करीत असताना विठ्ठल कांबळे हे लहानपणी त्यांच्यासोबत बेळगावला जात. त्यांनाही स्वातंत्र्य लढ्याची जाणीव झाली असावी. तसे महात्मा गांधीजींचे विचार व इंग्रज सत्तेविषयीची चीड येणे स्वाभाविक होते. दरम्यानच्या काळात जेव्हा 1930 साली जंगल सत्याग्रहात त्यांनी पुढाकार घेऊन आपला सक्रिय सहभाग नोंदवला. त्यामुळे त्यांना लहान वयातच हिंडलगा (बेळगाव) येथील कारागृहात सहा महिन्याची शिक्षा भोगावी लागली. त्यावेळी त्यांची आई गौराबाई यांनी धैर्याने तोंड देत कुटुंबाला आधार दिला. पती गुंडू कांबळे ना झालेली मारहाण, मुलगा विठ्ठल याला भोगावा लागलेला तुरुंगवास अशा कठीण परिस्थितीतही न डगमगता भुमिगतांना मदत केली. विठ्ठल गुंडू कांबळे यांच्या या कार्याची माहिती स्वातंत्र्यसैनिक चरित्र कोषात नोंद आहे. तथापि, हिंडलगा जेल मधील त्यांना आवश्यक ती कागदपत्रे मिळू न शकल्याने त्यांना स्वातंत्र सैनिक सन्मान पेन्शन योजनेपासून शेवटपर्यंत वंचित रहावे लागले. (नातू गुंडू लक्ष्मण कांबळे, रा. बेळगाव यांची मुलाखत)

चिंचणे मधील पुढील जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी म्हणजे बसवंत लक्ष्मण पाटील (जन्म 1901, मृत्यू 1963) हे होत. ते महादेव कोळी या आदिवासी जमातीत जन्मल्यामुळे शेतीबरोबरच वनोपज गोळा करणे, कंदमुळे काढणे इ. व्यवसायांसह जंगल धंदे करीत होते. त्यांना वनौषधीचेही चांगले ज्ञान होते. अशातच ब्रिटिशांनी स्थानिक आदिवासींच्या जंगल व जमिनीच्या वापरावर घातलेल्या निर्बंधाला विरोध करण्यासाठी गावातील सर्व जातीच्या तरुणांनी जंगल सत्याग्रहात स्वयंस्फुर्तीने सहभाग घेतला. (नातू बसवंत मल्लापा पाटील रा. कसबा बावडा, कोल्हापूर यांची मुलाखत) 1942 च्या आंदोलनात अनेकांनी भूमिगत राहून कार्य केले. अशा भूमिगतांना बसवंत पाटील यांनी आश्रय दिला. गुप्त माहिती पुरवली, सर्व प्रकारचे सहकार्य केले. त्यामुळे त्यांना तीन महिने स्थानबद्ध करण्यात आले. (स्वातंत्र्यसैनिक चरित्र कोष खंड-३, पान – ४१)

बसवंत पाटील यांच्या वीर पत्नी भरमव्वा पाटील बेळगाव येथील 1924 साली झालेल्या राष्ट्रीय काँग्रेस

सभेविषयी घरी आठवणी सांगत असत. त्यानुसार अशी माहिती मिळते की, बेळगाव व चिंचणेसह आसपासच्या गावांना अशी खबर मिळाली की दिल्लीवरून कोणीतरी गांधीबाबा बेळगावला सभेसाठी येणार आहेत. त्यावेळी चिंचणे येथील बरेच तरुण व महिला दोन दिवसांच्या भाकरी बांधून, जंगलातील पायवाटा तुडवत गांधीजींच्या सभेला गेले. त्यावेळी भरमव्वा पाटील आपल्या पतीबरोबर त्या सभेस हजर होत्या. (नातू बसवंत पाटील यांची मुलाखत) या सभेमध्ये महात्मा गांधींनी प्रत्येकाकडून प्रतिज्ञापत्रे भरून घेतली. व त्या सर्व लोकांनी 25 पैसे (चार आणे) वर्गणी भरून काँग्रेसचे सभासदत्व स्वीकारले. (स्वा.सै. भरमव्वा पाटील यांचे सुपुत्र अरुण पाटील यांनी माहिती दिली) चिंचणे गावातील उपस्थित सर्व लोक महात्मा गांधीजींच्या भाषणांनी प्रेरित झाले असावेत. याचाच परिणाम असा असावा की बेळगावच्या आसपासच्या खेड्यातील लोक हे बहुसंख्येने स्वातंत्र्यलढ्यात सहभागी असलेले दिसतात.

महात्मा गांधीजींचा स्वातंत्र प्राप्ती विषयीच्या विचारांचा प्रभाव, ब्रिटिशांनी घातलेल्या जंगल निर्बंधांना विरोध म्हणून चिंचणे गावातील लोक ही मोठ्या संख्येने स्वातंत्र्यलढयात सहभागी झालेले दिसतात. त्यामध्ये नाना मशाप्पा गुरव, भरमाण्णा ओमान्ना पाटील, दुंडाप्पा हनुमंत पाटील, बसवंत सुबराव चिगरी, शंकर नाना गुरव, पार्वतीबाई / लक्ष्मीबाई शंकर गुरव व रामचंद्र नाना गुरव इत्यादींचा समावेश होता. (स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोष, खंड-३)

बसवंत लक्ष्मण पाटील यांचे चुलत भाऊ भरमाण्णा ओमान्ना पाटील हे बसवंत पाटील यांच्या कार्याने प्रेरित होऊन तेही स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय राहिले. त्यांनी 1942 च्या चले जाव चळवळीत भूमिगत राहून कार्य केले. त्यासाठी ते सव्वा वर्षे अंडर ट्रायल राहिले, आणि पंधरा दिवस त्यांना सक्तमजुरीची शिक्षा झाली. (स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोष, पान नं. ४३, मुलगा अरुण भरमांण्णा पाटील, रा. चिंचणे यांची मुलाखत)

दुंडाप्पा हणमंत पाटील (जन्म ७ जानेवारी १९१७, मृत्यू १९७८) शिक्षण- कन्नड इयत्ता- सहावी) दुंडाप्पा पाटील हे ही महात्मा गांधीजींच्या विचाराने प्रेरित होऊन भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांना मदत करीत. तसेच स्वतःही भूमिगत राहून क्रांतिकारकांना गुप्तपणे माहिती पोहोचवणे, व इतरही गोष्टींमध्ये सहकार्य करीत. त्यांनी १९४१ च्या वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेतानाच आपल्या इतर सहकाऱ्यांना प्रेरित केले. त्यासाठी त्यांना हिंडलगा (बेळगाव) येथे चार महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा व 50 रुपये दंड शिवाय दीड वर्ष कच्ची कैद झाली. (स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोष खंड-३, पान नं. ४१, मुलगा तातोबा दुंडाप्पा पाटील, रा. चिंचणे यांची मुलाखत)

बसवंत सुबराव चिगरी यांचे स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याचे मुख्य कारण म्हणजे त्यांचे मामा बसवंत लक्ष्मण पाटील हे होत. त्यांनी भूमिगत राहून 1942 च्या चळवळीत आपला सहभाग नोंदवला. महात्मा गांधीजींचे विचार आणि स्वातंत्र्य प्राप्तीचे ध्येय. त्याची जंगल व दऱ्याखोऱ्यातील स्थानिक लोकांमध्ये जाणीव व जागृती करण्याचे महत्त्वाचे काम बसवंत चिगरी यांनी केले. (भाचे बसवंत मलाप्पा पाटील यांची मुलाखत) त्यांना एक वर्ष नऊ महिने कच्ची कैद झाल्याचा संदर्भ आपणास महाराष्ट्र शासन, स्वातंत्र्यसैनिक चरित्र कोषात पान नं. 21 वर मिळतो.

महात्मा गांधी यांचे विचार आणि स्वातंत्र लढा यांनी प्रेरित होऊन भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये आपले मोलाचे योगदान देणारे चिंचणेतील गुरव कुटुंबीय होत.

नाना मशाप्पा गुरव (जन्म १८९७, मृत्यू-१९६०) हे चिंचणे - ग्रामदैवत मसणाई मंदिरात पूर्वापार गुरव म्हणून काम करीत होते. त्यांचे जेष्ठ सुपुत्र शंकर नाना गुरव (जन्म 1921, शिक्षण- मराठी तिसरी इयत्ता) व स्नुषा पार्वतीबाई / लक्ष्मीबाई शंकर गुरव, तसेच द्वितीय सुपुत्र रामचंद्र नाना गुरव या सर्वांनी स्वातंत्र्य लढ्यामध्ये हिरीरीने सहभाग घेतला. (पार्वती बाईंचा मुलगा प्रा. बाबू शंकर गुरव, रा. सांगली यांची मुलाखत )

नाना मशाप्पा गुरव हे गुंडू लक्ष्मण कांबळे व बसवंत पाटील यांचे समवयस्क सहकारी. गांधी विचार व कार्याने भारावलेले नाना गुरव यांनी 1942 च्या चलेजाव चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. त्यासाठी त्यांना तीन महिने स्थानबद्ध करण्यात आले. वडिलांच्या स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग व त्यांच्या विचारांनी प्रभावित होऊन शंकर नाना गुरव (जन्म -1921) हे तरुण वयातच स्वातंत्र लढ्याकडे आकर्षित झाले असावेत. त्यांनी 1941 च्या वैयक्तिक

सत्याग्रहात भाग घेतला. त्यासाठी त्यांना चार महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली. तरीही त्यांनी निडरपणे 1942 सालापासून पुढे चार वर्षे भूमिगत राहून स्वातंत्र चळवळीमध्ये कार्य केलेचा संदर्भ स्वातंत्र्यसैनिक चरित्र कोषात मिळतो. रामचंद्र नाना गुरव यांनीही 1942 साली भूमिगत राहून कार्य केले, त्याबद्दल त्यांनाही तीन महिने स्थानबद्ध करण्यात आलेची नोंद महाराष्ट्र शासनाच्या रेकॉर्डमध्ये मिळते.

शंकर नाना गुरव यांच्या पती पार्वतीबाई / लक्ष्मीबाई गुरव प्रारंभी सासरे, दिर व पती यांचा स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग व प्रसंगी झालेली कैद यामुळे त्यांनी समर्थपणे घरची जबाबदारी सांभाळली. त्यांनी भूमिगतांची जेवणाची व्यवस्था करणे, गुप्त माहिती, निरोप पोहोचवणे तसेच आवश्यक असल्यास त्यांना आश्रय देणे अशी जोखमीची कामे पार पाडली. त्यांचे सख्खे बंधू दुंडाप्पा हनमंत पाटील व पतीच्या विचार, धाडस व कार्याने प्रेरित होऊन 26 जानेवारी 1944 च्या सत्याग्रहात भाग घेतला. त्यासाठी त्यांना एक महिना साध्या कैदीची शिक्षा झाली. गांधी विचारांच्या त्यांच्या कुटुंबावर एवढा पगडा होता की त्यांनी आपल्या मुलीचे नाव कस्तुरबा या नावावरून कस्तुरी असे ठेवले. (रामचंद्र गुरव यांच्या पत्नी भरमव्वा गुरव, रा. चिंचणे यांची मुलाखत, स्वातंत्र्यसैनिक चरित्र कोष खंड-३. पान नं. १७)

भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर काही वर्षांनी या सर्व स्वातंत्र्यसैनिकांच्या स्वातंत्र चळवळीतील कार्याची योग्य ती दखल घेऊन त्यांचा सन्मान केला. त्यांना स्वातंत्र सैनिक सन्मान पेन्शन 1980 पासून सुरु करण्यात आली. पण ब्रिटिशांनी बऱ्याच ठिकाणी जेलमधील रेकॉर्ड हेतू पूर्वक नष्ट केल्याने बऱ्याचशा स्वातंत्र सैनिकांची नोंद शासकीय रेकॉर्डमध्ये आढळत नाही. त्यामुळेच ते आयुष्यभर स्वातंत्र सैनिक सन्मान पेन्शन पासून वंचित राहावे लागले. त्यापैकीच एक म्हणजे विठ्ठल गुंडू कांबळे हे होत.

अशाप्रकारे अतिशय दुर्गम अशा चिंचणे गावातील लोकांचा एवढया मोठया प्रमाणात असलेल्या स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग हा लक्षणीय, गौरवास्पद आणि प्रेरणादायी असा आहे. यामागील महत्वाची प्रेरणा ही 1924 ची राष्ट्रीय काँग्रेसची बेळगाव येथील सभा व त्यातून महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रभाव आणि परिणाम असावा याची प्रचिती आपणास येते ती म्हणजे पार्वतीबाई गुरव यांच्या कार्यावरून. त्यांनी स्वतःला मिळणाऱ्या स्वातंत्र्य सैनिक सन्मान पेन्शन मधून गावातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य केले व गांधी विचारांचा वारसा पुढे चालू ठेवला.

पण सर्वांचे लक्ष वेधण्यासारखी गोष्ट म्हणजे अशा पद्धतीने देशाच्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये बहुमोल कार्य केलेले 'चिंचणे' हे गाव दुर्लक्षित राहिले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या ७५ वर्षानंतरही म्हणजेच देशभर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला जात असताना चिंचणे हे गाव कोणत्याही प्रगतीपासून वंचित आहे. आजही येथे वाहतुकीच्या पुरेशा सुविधा नाहीत, आरोग्य विषयक सुविधांचा अभाव प्रकर्षाने जाणवतो, तहसीलदार कार्यालय हे गावापासून अतिदूर असल्याने शासकीय उपाययोजना गावात लवकर पोहोचण्यास अडथळा निर्माण होतो. शेती शिवाय इतर कोणते उद्योगधंदे गावात उपलब्ध नसल्यामुळे रोजगार निर्मितीचे कोणतेही साधन तरुणांना उपलब्ध नाही. गावांमध्ये माध्यमिक शिक्षणाची सोय नसल्यामुळे विद्यार्थ्यांचेही विशेषत: मुलींचे पुढे शिक्षण घेण्याचे प्रमाण नगण्य आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षांमध्ये ज्ञात-अज्ञात स्वातंत्र सैनिकांना अभिवादन करीत असताना ज्या स्वातंत्र सैनिकांनी स्वतंत्र भारताचे स्वप्न पाहिले व त्यासाठी त्याग व बलिदान दिले अशा स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन म्हणून सर्व दुर्लक्षित, अविकसित खेड्यांकडे शासनाने प्राधान्याने लक्ष दिले पाहिजे. हेच त्यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील कार्याला अभिवादन ठरेल, असे मला प्रामाणिकपणे वाटते.